महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
राज्य प्रकल्प संचालनालय
राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान(रुसा)
युनिट क्र. २, १८ वा माळा, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१,
कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
ई-मेल-- spdrusamah@gmail.com
दूरध्वनी क्र.०२२-२२१६०९४३/५९

जा. क्र.राप्रसं/रुसा/आदेश/२०२०-२१/ ११२८

दिनांक - २१ऑक्टोबर, २०२०

# कार्यालयीन मंजूरी आदेश

विषय :- राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून मंजूर झालेल्या केंद्र व राज्य हिश्याच्या निधी वाटपास मंजूरी देणेबाबत.

संदर्भ:- १) मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.२४-३७/२०१४-U.Policy(MHMulti Gen,SC,ST), दि. १०/०५/२०२०.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे शासन निर्णय क्र. रुसायो-२०१८/प्र.क्र. ३४३/ विशि-३, दि. ०१ ऑक्टोबर, २०२०.

प्रस्तावना

राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान या योजनेतंर्गत रुसा १.० अंतर्गत मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली येथे झालेल्या प्रकल्प मंजूरी मंडळाच्या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्यास रुपये २७१.०० कोटीच्या आराखडयास मंजूरी मिळालेली आहे. त्यामध्ये विद्यापीठांसाठी भौतिक सुविधा या घटकातंर्गत राज्यातील ९ विद्यापीठांचा समावेश आहे. उक्त विद्यापीठांना घटक क्रमांक ३ (Infrastructure Grants to Universities) अंतर्गत प्रत्येकी रु. २०.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने संबंधित विद्यापीठांनी त्यांच्या कामांचा तपशीलवार प्रकल्प अहवाल(DPR) संचालनालयास सादर केले आहेत. केंद्र शासनाचा हिस्सा तसेच राज्य हिश्यापोटी उपलब्ध झालेला निधी संदर्भ क्र. २ अन्वये वितरीत करणे प्रस्तावित आहे. त्यानुसार पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश -

विद्यापीठांसाठी भौतिक सुविधा (Infrastructure Grants to Universities) या घटकाअंतर्गत केंद्र शासनाचा हिस्सा रु. २१.०० कोटी व राज्य हिस्सा रु. १४.०० कोटी असा एकुण रु. ३५.०० कोटी इतका निधी खालील तक्त्यात नमूद केलेल्या विद्यापीठांना अटी व शर्तीच्या अधिन राहूनमंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विद्यापीठाचे /महाविद्यालयाचे नाव | केंद्र हिस्सा (६०%) | राज्य हिस्सा (४०%) | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई विद्यापीठ, मुंबई | ३,००,००,०००/- | २,००,००,०००/- | ५,००,००,०००/- |
| २ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | ३,००,००,०००/- | २,००,००,०००/- | ५,००,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | ३,००,००,०००/- | २,००,००,०००/- | ५,००,००,०००/- |
| ४ | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | ३,००,००,०००/- | २,००,००,०००/- | ५,००,००,०००/- |
| ५ | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, मुंबई | ३,००,००,०००/- | २,००,००,०००/- | ५,००,००,०००/- |
| ६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | ३,००,००,०००/- | २,००,००,०००/- | ५,००,००,०००/- |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | ३,००,००,०००/- | २,००,००,०००/- | ५,००,००,०००/- |
| एकूण | | २१,००,००,०००/- | १४,००,००,०००/- | ३५,००,००,०००/- |

अटी व शर्ती -

१) रुसाच्या निधीसाठी राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये स्वतंत्र बचत खाते उघडावे. त्या खात्यामध्ये दुसरा कोणताही व्यवहार करु नये. सदर खाते PFMS या सिस्टमशी लिंक करावे.

२) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत साधनसामुग्री व उपकरणे खरेदी प्रक्रिया वित्तीय अधिकार नियम पुस्तिका दि. १७ एप्रिल, २०१५ च्या तरतुदी तसेच शासनाने उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दि. ०१ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करावी तसेच विद्यापीठांनी दि. २४ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयान्वये GEM Portal वरुन करण्यात यावी.

३) विद्यापीठाने खरेदीच्या कामांना आपल्या स्तरावर विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे प्रशासकिय तसेच तांत्रिक मंजूरी प्रदान करावी/ प्राप्त करुन घ्यावी.

४) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत अकृषी विद्यापीठांनी प्रदान केलेल्या तांत्रिक व प्रशासकीय मंजूरीच्या अधिन राहून प्रकल्पाची बांधकामे विद्यापीठनिहाय प्रचलित कार्यपध्दतीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अथवा स्वत:च्या अभियांत्रिकी विभागाकडून करण्यात यावी.

५) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत साधनसामुग्री व उपकरणे खरेदी प्रक्रिया सर्व अकृषी विद्यापीठांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील वित्तिय तरतुदीनुसार व महाराष्ट्र विद्यापीठ लेखा संहिता २०१२ मधील तरतुदी तसेच शासनाने उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दि. ०१/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदरची खरेदी प्रक्रिया विद्यापीठांनी आपल्या स्तरावर पार पाडावी. या संदर्भातील सर्व प्रचलित अटी व शर्तीचे पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यापीठ प्रशासनाची राहील.

६) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान २.० च्या मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण तपशीलवार प्रकल्प अहवालाच्या एकूण मंजूर रकमेच्या प्रमाणात नवीन बांधकाम, नूतनीकरण व उपकरण खरेदी यांचे प्रमाण अ. ५०:३०:२० ब. ४०:५०:१० क. ४५:४५:१० यापैकी एका प्रमाणात खर्च करणे बंधनकारक आहे.

७) सविस्तर प्रकल्प अहवाला बाहेरील कामांना पुर्व परवानगी शिवाय बदल करता येणार नाहीत.

८) खरेदी, नवीन बांधकाम किंवा नूतनीकरण करण्यात येणाऱ्या बाबीवर राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान ( रुसा ) योजनेचा लोगो तसेच "रुसाच्या सौजन्याने" असे लिहून प्रथम दर्शनी दिसेल अशा स्वरुपात लावणे अनिवार्य आहे.

९) रुसा २.० अंतर्गत वितरित केलेला निधी विद्यापीठांनी विहित कालावधीमध्ये खर्च पूर्णपणे करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. विद्यापीठांना वितरित करण्यात आलेल्या निधीच्या खर्चाची तसेच कामांची माहिती दर महिन्याच्या पहिल्या आठवडयात, तसेच झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र(Form १२C या नमुन्यात) दर महिन्याला तपशीलवार खर्चाच्या माहितीसह या संचालनालयास सादर करावे.

१०) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचे संनियंत्रण खालील नमुद केलेली प्रकल्प सनियंत्रण समिती करेल.

१. कुलगुरु - समितीचे अध्यक्ष

२. कुलसचिव - सदस्य सचिव

३. वित्त व लेखा अधिकारी- सदस्य

४. विद्यापीठ अभियंता - सदस्य

५. वास्तुविशारद

६. रुसा समन्वयक

११) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत प्राप्त निधीचे लेखापरीक्षण करुन अहवालाची प्रत प्रत्येक वर्षी रुसा राज्य प्रकल्प संचालनालयास पाठविण्यात यावी. तसेच त्यासाठी रोख वही (Cash Book) स्वतंत्रपणे ठेवण्यात यावी.

१२) विद्यापीठांनी रुसा योजने संदर्भातील सर्व कागदपत्रे, लेखापरिक्षण, महालेखापाल, महाराष्ट्र - १ किंवा प्रकरणपरत्वे महाराष्ट्र- २ नागपूर यांनी सदर कामाकरीता प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तपासण्याचे अधिकार असून, त्यांनी मागणी केल्यास सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणीकरीता उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

१३) विद्यापीठांनी रुसा योजने संदर्भातील सर्व कागदपत्रे, लेखापरीक्षण अहवाल इ. या संचालनालयाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना तपासणीस उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

१४) विद्यापीठांनी पुरवठादारास/ कंत्राटदारास अदा करावयाची देयकाची रक्कम PFMS द्वारे त्यांच्या बँक खात्यात वर्ग करावी. रोखीने व्यवहार करु नये.

१५) या आदेशान्वये प्रत्येकी रुपये ५.०० कोटी इतका निधी PFMS द्वारे विद्यापीठाच्या रुसा अनुदानासाठी उघडलेल्या स्वतंत्र बचत बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येत आहे.

१६) विद्यापीठांनी नवीन बांधकाम/ नुतनीकरणाचे काम Energy Conservation Building Code २०१७, Bureau of Energy Efficiency, Ministry of Power, Government of Indiaमार्गदर्शक तत्वानुसार पार पाडावे.

१७) विद्यापीठाने रुसा अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या सोयी सुविधा, पुस्तके, उपकरणे नजदीकच्या महाविद्यालयांसाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

१८) विद्यापीठांनी खरेदी केलेले उपकरणे लवकरात लवकर स्थापित करुन ती विद्यार्थ्यांच्या वापरासाठी खुली करावीत.

१९) विद्यापीठांनी पुरवठा आदेशानुसारच खरेदी झाली आहे काय याची खात्री करावी.

२०) विद्यापीठांनी खरेदी करताना निविदा संकेतस्थळ व वर्तमानपत्रे यामध्ये प्रसिध्द करावी.

२१) विद्यापीठांनी खरेदी कलेल्या उपकरणांची जड वस्तू संग्रह नोंदवहीत (Serial Number wise) नोंद घ्यावी.

२२) पुर्व परवानगीशिवाय सविस्तर प्रकल्प अहवालाबाहेरील करण्यात आलेला खर्च अनुज्ञेय असणार नाही.

२३) विद्यापीठांनी रुसा निधी अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची तसेच उपक्रमांची माहिती प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

राज्य प्रकल्प सहसंचालक
राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रुसा)

State Project Joint Director
State Project Directorate
Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan
Mumbai

प्रति-

१. मा. कुलगुरु, संबंधीत विद्यापीठे.
२. कुलसचिव, संबंधीत विद्यापीठे.
३. लेखा अधिकारी, संबंधीत विद्यापीठे.
४. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. उपसंचालक (वित्त), राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान
६. निवड नस्ती (रुसा)